# मी डिफ्यूजर तंत्रज्ञान वापरले नाही आणि माझ्या अडचणी कायम राहिल्या व काही अडचणी वाढल्यादेखील !

डिफ्यूजर तंत्रज्ञानाची मला योग्यवेळी माहिती मिळाली होती. परंतु त्यावेळी त्याचे महत्त्व लक्षात न आल्याने डिफ्यूजरसाठी जास्त खर्च होतो, तो खर्च वाचावा म्हणून मी त्याकडे दुर्लक्ष केले आणि अनेक चांगल्या संधी गमावल्या, डिफ्यूजरच्या किमतीपेक्षा कितीतरी जास्त नुकसान मला ती शेतीपध्दती न स्विकारल्यामुळे भोगावे लागत आहे हे आता लक्षात येत आहे. डिफ्यूजर वापरणाऱ्या बागाईतदारांच्या आणि माझ्या आर्थिक परिस्थितीत या काळात जी तफावत पडली आहे, त्यांची ज्या वेगाने प्रगती झाली ती पाहता ''डिफ्यूजर तंत्रज्ञान'' न वापरून मी आत्तापर्यंत मोठी चूक केली आहे असे मान्यच करावे लागेल.

पाण्यासाठी मी बोअरसाठी दहा हजार रुपये खर्च केले. परंतु जमिनीत साठण्यासाठी अनेक वर्षे लागलेले पाणी एकदा संपल्यावर त्याचे संपूर्णपणे पुनर्भरण एका पावसाळ्यात होत नसते. त्यामुळे माझी अनेक बोअर फुकट गेली. पाण्यासाठी चढाओढीने जमिनीचे खाली जाणे, त्यासाठी वीजेवर अवलंबून असणे एवढे करून पाण्याची शाश्वती नाही. मग पाण्यासाठी वणवण करणे याऐवजी दुसरा विश्वासार्ह शाश्वत पर्याय शोधण्याची आवश्यकता आहे. डिफ्यूजर व अस्तरित शेततळे हा तो शाश्वत पर्याय आहे. असे आमच्या आता लक्षात आले आहे. डिफ्यूजर तंत्राने एकरी वर्षाला केवळ दहा लाख लिटर पाणी लागले. (ड्रीप पध्दीने ३० ते ३५ लाख लिटर एकरी वर्षाला पाणी लागते.) आणि एवढे कमी पाणी – १० लाख लिटर एकरी पाऊसकाळात, कितीही कमी पाऊस पडला तरी, उपलब्ध करून घेता येत असते. आपल्या भागातील ओढे, नाले, नद्या पाऊसकाळात थोडाकाळ का होईना पण वाहात असतात आणि हे किमती पाणी आपल्या पाणलोट क्षेत्राबाहेर निघून जात असते. आपण मात्र नंतर पाण्यासाठी वणवण करीत असतो आणि पाण्याअभावी जमिनी पडीक ठेवतो. अनेकवेळा तर आपल्या विहीरीदेखील पावसाळ्यात भरलेल्या असतात. मात्र नंतर जमिनीखालील प्रवाहातून हे पाणी दुसरीकडे निघून जात असते. त्यातले गरजेइतके म्हणजे फारच थोडे पाणी अस्तरित शेततळ्यांत साठवून ठेवले तर आपला पाणीप्रश्न सुटू शकतो.७ ।। एचपी चा पंप चोवीस तास चलला तर दहा लाख लिटर पाणी उचलतो आणि डिफ्यूजर तंत्राने एवढे पाणी फळबागेला एक एकरला एका सिझनला पुरेसे होते. त्याचे किमान ७/८ लाख रुपये उत्पन्नही मिळते. असे पाणी साठवूल ठेवण्यासाठी दहा लाख लिटरला दहा हजार रुपये खर्च येतो आणि त्यातून पाणी व उत्पन्न हुकमी मिळते. पाऊसकाळात पाण्याची बेगमी करून ठेवल्यावर निश्चितपणे फळ उत्पादन घेता येत असते. डिफ्यूजर तंत्रामुळे एकतर एकरी वार्षिक पाणी कमी लागते व त्याचे उत्पन्नही जास्त होते. त्यामुळ अस्तरित शेततळ्यात पाणी साठवून ते पाणी वापरणे आता शक्य झाले आहे. डिफ्यूजरशिवाय असे पाणी साठविणे व ते वापरणे खर्चाच्या दृष्टीने शक्य होत नाही. डिफ्यूजर वापरणारे माझे मित्र आता त्यामुळे पाणी प्रश्नातूनही मुक्त झाले

**डिफ्युजर न वापरणारा बागायतदार :–**



आहेत. हे मला कळणेस उशीर झाल्याने मी डिफ्यूजर तंत्राकडे दुर्लक्ष केले. त्याचे परिणाम मी कमी उत्पादन, उत्पादनाचा दर्जा कमी, जागा पडीक रहाणे, बागा वाळणे अशा विविध स्वरुपात भोगत आहे. त्यामुळे २-४ वर्षापूर्वी असलेले माझे सर्व प्रश्न आजही कायमच आहेत. त्यातून मार्ग कसा काढावयाचा याच्या विवंचनेत मी नेहमी असतो. डिफ्यूजर तंत्रज्ञान हे या सर्व प्रश्नावरील उत्तर आहे हे आता ध्यानात येऊ लागले आहे. डिफ्यूजर न वापरणे हे त्याच्या किमतीच्या मानाने कितीतरी अधिक महाग पडत आहे. बागायतीत जादा पाणी, जादा औषधे व खते, कमी उत्पादन, उत्पादनाचा दर्जा कमी, फळे तडकणे, यातून आपण दरवर्षी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे डिफ्यूजरच्या किमतीच्या काहीपट नुकसान/खर्च करीतच असतो. पण आपल्या ते लक्षात येत नाही. झाड कसेही हाताळले तरी थोडेफार उत्पन्न देतेच देते. त्यामुळे आपण जी शेतीपध्दती वापरत आहोत तिच्यात सुधारणा करणे आवश्यक व शक्य आहे असे आपल्याला वाटत नाही. त्यातून सर्व अडचणींची दुष्टचक्र कायमच राहते. माझे डिफ्यूजर वापरणारे एक मित्र मला हे परोपरीने समजावून सांगत होते पण त्यांना 'कमशिन' मिळत असेल असे समजत मी त्या सांगणाऱ्याकडे दुर्लक्ष केले ते फारच महाग पडले. ''श्रीराम टाईल्स'' ही कंपनी कमिशन देऊन डिफ्यूजरची विक्री करण्यापेक्षा बागाईतदारांचे प्रबोधन करून डिफ्यूजरची विक्री करणेवर भर देते हे मला नंतर समजले. त्यासाठी ते त्यांच्या विविध पुस्तिकांचे विनामूल्य वितरण करतात. डिफ्यूजरचा वापर असलेल्या बागांना भेटी देण्याचा आग्रह करतात, विनंती केल्यास आपल्या बागेला भेट देऊन तेथे नेमके काय केले पाहिजे याची माहिती आपलेपणाने देतात हे माझ्या लक्षात आले नाही. त्यातून माझेच नुकसान झाले. मी जरी डिफ्यूजर वापरले नाहीत तरी हे सुधारीत तंत्रज्ञान समजावून घेऊन आपल्या बागेत वापरणारे अन्य बागाईतदार कंपनीला मिळत असातातच. असो.

**त्यामुळे आता काहीतरी करून पैशाची जुळवाजुळव करून डिफ्यूजर तंत्रज्ञान बागेत राबविणेचा मी निर्णय घेतला आहे ! पुढच्या टप्प्यात अस्तरित शेततळेही करणार आहे. !**

**वर्तमानकाळाची परिस्थिती आपल्या जुन्या निर्णयांचा परिणाम असते आणि आपला भविष्यकाळ कसा असेल हे आजच्या आपल्या विचारावर आणि निर्णयावर अवलंबून आहे. !**